# १५

# लोकमान्यांचें देहावसान !

## पोवाडा.

( हा पोवाडा लेखकानें १९२० सालींच लोकमान्यांच्या देहावसानानंतर लगेच लिहिला आहे. )

अगाध लीला परमेशाच्या घडवी संसार ।
जगताचा बहुविधा करुनिया घेउनि अवतार. ॥
पानपतीं संग्राम चालला भीषण घनघोर ।
धन्य बाळ विश्वास, सदाशिव गेले मद्दशूर ! ॥
' हर हर हर हर ' शब्द चालला हृदयें भेदून ।
' खण खण खण खण ' शब्द दाटला गगनीं संपूर्ण ॥





चाल—जरि असे दैव वांकडें । कांहिं नच घडे । येति सांकडें ।
एकत्र जमुनिया सारीं । तात्या देव ही मारी ।
शूर मराठे भूमातेंकीं निजले हो सारे ।
उघडीं झालीं स्वागत करण्या तीं स्वर्गद्वारें ॥ २ ॥
नाना आले सद्बुद्धीची घेउनिया ठेव ।
उभा राहिला उद्योगाच्या पार्श्वभागीं देव. ॥
राज्य राखिलें त्या मर्दानें पुण्य शिवाजीचें ।
आलें रे आमंत्रण त्याला निष्ठुर देवाचें ॥
गेले गेले शिवबा गेले, ते दिवसहि गेले ।
सौख्याचे ते बागबगीचे पार शुष्क झाले ! ! ॥
चाल—ते धन्य होउनी गेले । राज्य घडविलें । दुष्ट नाशिले ॥
सत्प्रेम मिसळुनी गेले । हृदयांत वीर्य कालविलें ॥
दैवाचा दुर्विपाक झाला पुण्य-भाग सरला ।
धीर द्यावया परि लोकांला एक पुरुष आला ! ॥ ३ ॥
आला आला अमित तपोबल वंदित बलवंत ।
शंखचक्र करिं धरुनि पातला विष्णु मूर्तिमंत ॥
उदयाचलिं चंडांशु रंगला पारतंत्र्यरजनी !
थर थर कांपे कांहिं कळेना काय करिल ह्मणुनी !
मदोन्मत्तता विचार करिते ' भ्याड काय करितो ! ' ।
शस्त्रशक्तिपंचाननपुढती अहा काय करि तो ! ॥

चाल–परि असे एकटी शक्ती । गुप्त राहती । आर्यधर्मी ती ।
'अध्यात्मशक्ति' त्या नांव । शस्त्रास्त्र शक्तिला घाव ।
घालुनी जयान्वित होय ॥

ठावे कैंचें हें त्या आमुच्या सुज्ञ बांधवाला ? ।
भौतिकसुखिं मर्यादित ज्याची सर्व शक्ति त्याला ? ॥ ४ ॥
चढत चालला अनुक्रमानें 'बाल' अंतरिक्षीं ॥
त्या तेजानें दिपत जाउनी नृपती त्या लक्षी ।
सुरतेचीं तीं मेघमंडळें काळिकुट्ट सगळीं ।
शकलें करुनी, करुनि विदारित, आपद्विषहि गिळी ।
षड् वर्षें कारागृहिं रुधिला गंगाधरतनय ।
रुधिला कैंचा, दिसे आह्मांला, तेज न गत होय ॥

चाल–तो गीतारहस्य लिहुनी । शांतिपद वरुनि !
पातला भुवनीं । गीतामृत सकला द्याया । अमृतें
अमरपद ध्याया ।

"'बाल' दिवाकर चढत चालला आला माध्यान्हीं ॥
तेज तयाचें प्रचंड झालें, असह्य या भुवनीं ॥
श्रीमंताला कुरवाळुनि, करिं गरिबाला धरुनी ! ।
सिंचुनि प्रेमामृत, संपादुनि अतुल कीर्ति भुवनीं ॥
शत्रूंनाही मित्र करोनी, देशकार्य करुनी ।
संघ घडवुनी, भूमातेला सुपुत्र साजोनी ॥





आर्यमहीवरि स्वातंत्र्याचा वरद हस्त धरुनी, ।
'लोकमान्य' पदवीयुत होत जी दिली बांधवांनीं ॥

चाल–पश्चीम दिशेला गेला ! रक्तपट त्याला । नेत्र फिरविला ! ।
देशांतरिं गडबड झाली । नैराश्यपंकिं भू रुतली ! ।

बालरवी अस्तंगत झाला, शोक–सागरांत ।
बुडली नौका आर्यमहीची, एकच आकांत ! ॥ ६ ॥
हाय ! हाय ! रे दुष्ट कृतांता ! हें केलें काय ? ।
कां नच तुजला हृदयाचें तें बंधन, रे हाय ! ॥
गेले गेले सर्वहि गेले थोर थोर गेले ! ।
राम कृष्ण शिवबाही गेले रामदास गेले ! ॥
दादाभाई राष्ट्रपितामह, देश दास, गेले ।
धन्य असे हे सर्व हि गेले ! कां ? कोण गेले ? ॥

चाल–आज हा कळस चढविला ॥ पूर्ण जाहला । तिलक
घेतला; ॥ कां झाले सौख्य मनाला ? । कां झाले
सौख्य जिवाला ? ॥

परि ऐसे मी कैसे वदलों ? कृतान्त तो काय ? ।
सेवक परमेशाचा, देवचि दोषरपद होय ॥ ७ ॥
कां जगदीशा ! आजचि तुजला हाही आवडला ।
देवा केव्हांही तो तुमचा, आजचि कां नेला ? ॥
कां स्वर्गामधिं मुत्सद्यांची पडली ती वाण ।

ह्मणुनी नेला सत्वरिं येथुनि हा आमचा प्राण !।।
हिंद देविचे दुर्भाग्याचे अजुनि दिन न सरले !।
हेंचि खरें बा निंद्य असे रे त्वां कांहिं न केलें ।।
चाल–त्वां जरी देह नाशिला। जीव पळविला। सर्व हरपला;।
तरि सर्वहि फसली करणी। तो मूर्ति दिसे या नयनीं।
हृदयासनिं जो सतत विराजित सर्वांच्या झाला।
तो बा! आतां जाईल कैसा जरि आला घाला!।। ८ ।।
जीर्ण देह हा ह्मणुनी नेले कां देण्या त्याला।
अन्य देह तो पुनरपि देशा उद्धृत करण्याला?।।
जोंवरिं स्वातंत्र्याचा तरुवरि पूर्ण बहर न दिसे।
तोंवरि दहिवरजलकणसिंचन केले बा कैसे?।।
हाय हाय हा सद्बंधूंचा प्राणसखा गेला!।
प्रत्येकाचा विगतचेतन स्वस्थ देह ठेला!।।
चाल–तें तेज लुप्त जाहलें। धैर्य ना ढळें। भाग्य संपलें;।
शोकाकुल संप्रति झाले। लोक; दास्य नित्यचि ठेले।
संशय आला हाय असा हा, तिलक दीननाथा!।
हिंदभूसुता! पतितोद्धारा! कृपा करी आतां।। ९ ।।
अंधाराला दुरि करणारा दिनकर तो गेला!।
कैसें आतां करितिल तारे निरस्त तिमिराला?।।
अंधारामधिं धडपडतांना एक दीप होता!।।





तोही गेला; घोर तिमिर तो आज दिसे आतां!।
स्वैरपणें संचार चालला वन्य पशुवरांचा।
उगम दिसेना, मध्य दिसेना अंतहि मार्गाचा।।
चाल–तरि चला सर्व जाउया। विघ्न चिरडुया। मार्ग काढुया।
स्वातंत्र्य पूर्ण मिळवाया। मातेचें मोचन करुया।
'स्वराज्य माझा जन्मसिद्ध हा हक्कचि आहे' या।।
उक्तीला मनिं नित्य वागवुनि झिजवूया काया।। १० ।।

[illegible]
(नानिवडेकर)
१/१८, गोरेगांवकर चाळ,
गिरगांव, मुम्बई ४ (४००००४)